# Bachelor Of Design (B. Des)

## Career Opportunities

CONTACT US ON :

abhinavcareerscope

Abhinav CareerScope

9922695424

ABHINAV CAREER SCOPE

Perfect Career Guide

Reena Bhutada
Career Counsellor
Pune (9922695424)

Darshanaa T Lathi
Career Counsellor
Pune (7775831822)



# Need Of B. Des

- Bachelor Of Design Degree Helps Candidates Take Their Skills & Experience In The Field Of Design To The Next Level.
- Bachelor Of Design Career Options Provides A Wide Range Of Job Opportunities In Fields Such As Fashion Design, Graphic Designing, Product Designing, UX Designing, Interior Design, Design Consultancy, Education Industry & So On…
- The Versatile Skills Gained Through A B. Des Degree Allow Graduates To Explore Entrepreneurship, Freelance Work Or Interdisciplinary Design Roles Too.

# How To Become B. Des Professional

- Students Who Have Completed Their Class 10+2 From Science, Arts & Commerce Streams With 50 Percent Marks Can Study B. Des Course.
- Students Who Qualify With The Appropriate Cut-off Marks In Particular Entrance Tests Like NIFT, UCEED, NID, DAT, SEED, UID DAT, IIAD… etc
- An Aspirant For B. Des Admission Must Follow A Set Method, Which Includes Group Discussions, Written Entrance Tests, Drawing Tests, Interviews & So On.
- The Age Limit For Admission To B. Des Course Is A Minimum Of 19 Otr 20 Years As Specified By The Institutes At The Time Of Admission.

# Skill Sets & Qualities Required

- Creative Skills
- Analytical Skills
- Communication Skills
- Business Skills
- Time Management
- Artistic Skills
- Computer Skills
- Decision Making Skills
- Collaborative Skill



# Types Of Courses

**Bachelor's Programs :**

- B. Des In Fashion Design
- B. Des In Textile Design
- B. Des In Fashion Communication
- B. Des In Interior Architectural Design
- B. Des In Product Design
- B. Des In Graphic Design
- B. Des In Jewelry Design
- B. Des In User Experience Design
- B. Des In Visual Communication Design
- B. Des In Animation & VFX Design

# Top Colleges

- National Institute Of Design (NID)
- Indian Institute Of Design (IID)
- IDC, IIT Powai, Mumbai
- Terana Institute Of Design, Mumbai (Through CET)
- Thakur College Of Design, Kandivali, Mumbai (Through CET)
- UnitedWorld Institute Of Design, Ahmedabad (UID)
- MIT ID Pune (Through CET)
- MIT World Peace University, Kothrud, Pune
- Symbiosis Institute Of Design, Vimannagar, Pune
- Pearl Academy, Mumbai / Jaipur / Banglore
- Anant University, Ahmedabad
- Woxen University, School Of Design & Art, Hyderabad

# Top Colleges

- MIT – Loni Kalbhor
- Gurumantra Academics Pvt. Ltd, Erandwane, Pune
- GLS University, Ahmedabad
- Parul University, Vadodara
- Dr. D. Y. Patil School Of Design, Pune
- Vishwakarma University, Pune
- O. P. Jindal University
- Vedatya
- Chitkara University, Chandigharh
- Amity University, Noida
- Vogue Institute Of Art & Design, Baglore
- Whistling Woods International, Pune

CHITKARA UNIVERSITY

राष्ट्रीय डिज़ाइन संस्थान
NATIONAL INSTITUTE OF DESIGN

भारतीय शिल्प संस्थान
INDIAN INSTITUTE OF CRAFTS & DESIGN, JAIPUR

Whistling Woods International
INSTITUTE OF FILM, COMMUNICATION & CREATIVE ARTS

॥वसुधैव कुटुम्बकम्॥
SYMBIOSIS
INSTITUTE OF DESIGN

UNITEDWORLD™
institute of design

IDC School of Design
अभिकल्प विद्यालय

O.P. JINDAL GLOBAL UNIVERSITY

WOXSEN UNIVERSITY
SCHOOL OF ARTS & DESIGN

AMITY UNIVERSITY

MIT INSTITUTE OF DESIGN

# Job Opportunities

- Graphic Designer
- Fashion Designer
- Art Director
- Textile Designer
- Industrial Designer
- Product Designer
- UI / Ux Designer
- User Experience Designer
- Furniture Manufacturing
- Garment Manufacturing Unit
- Jewelry Designer
- Design Manager
- Fashion Show Management
- Costume Designer
- Color Consultancy
- Ceramic Designer
- Leather Design
- Entrepreneurs

# Top Recruiters

- Flipkart
- GlaxoSmithKline Consumer Healthcare Ltd.
- Taali Media Ltd.
- Tanishq
- Tata Consultancy Services
- Videocon
- Symantec India
- Accenture
- J. P. Morgan
- Wipro
- Oracle
- Adidas India
- Zomato
- Myntra
- Redbus
- GE Healthcare
- Godrej Industries
- Nokia Research
- Welspun

redBus

Flipkart

gsk
GlaxoSmithKline
Consumer Healthcare

TANISHQ
A TATA PRODUCT

TATA
CONSULTANCY
SERVICES
tcs

VIDEOCON

VIDEOCON

ORACLE

J.P.Morgan

zomato

Symantec.
Endpoint Protection

Myntra

Welspun

» संधी करिअरच्या... विवेक वेलणकर



# बारावीनंतर डिझायनिंग क्षेत्रात करिअर



गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांचा ओढा काहीतरी नवीन 'हटके' विषयांमध्ये करिअर करण्याकडे आहे. डिझायनिंग हे असे एक क्षेत्र आहे. डिझायनिंग म्हणजे रेखाटन वा चित्रकला , मॉडेल्स बनवणे, नवनवीन कल्पना काढणे असा सार्वत्रिक समज आहे, परंतु डिझायनिंग एवढ्यातच सिमित करता येणार नाही. कोणतीही वस्तू वा सेवा प्रणाली बनवताना ती तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, बनवण्याची प्रक्रिया, हेतू किंवा कार्य हे निश्चितच महत्त्वाचे असतात, पण त्याचबरोबर वापरकर्त्यांच्या शारीरिक क्षमता, भावनिक गरजा, सौंदर्य व आरामदायीपणाचे निकष, आजूबाजूचे संदर्भ व संस्कृती, शाश्वततेच्या गरजा या व अशा अनेक पैलूंचाही सखोल विचार करणे महत्त्वाचे ठरते.

ढोबळ मानाने पाहिले, तर वस्तू बनवताना दोन महत्त्वाच्या बाजूंचा विचार करायला हवा, एक म्हणजे तंत्रज्ञान (technology) आणि दुसरे म्हणजे अभिकल्पकी (design). यातील डिझाईनचे दोन भागांत विभाजन होते, एक म्हणजे सर्जनशीलता (creativity) व दुसरा म्हणजे विश्लेषणात्मक क्षमता (Analytical ability). डिझाईन म्हणजे या दोन्ही प्रकारच्या पैलूंचा सुयोग्य मेळ घालून वापरकर्त्यांच्या समस्यांवर किंवा गरजांवर नवनवीन उपाय शोधण्याचे कार्यक्षेत्र. डिझायनिंग क्षेत्रात सगळ्यात महत्त्वाची आवश्यकता असते ती सर्जनशीलता अर्थात क्रिएटिव्हिटी. सर्जनशीलता ही अशी क्षमता आहे, ज्याद्वारे विद्यार्थी नावीन्यपूर्ण, विस्मयकारक व मूल्यवान कल्पना किंवा कलाकृतींची निर्मिती करू शकतो. डिझायनिंग क्षेत्रात करिअर करायचे असल्यास लागणारी क्षमता व कौशल्ये चार प्रकारची असतात

१. हस्तकौशल्य व स्वानुभवातून कृती

२. चिंतन, विश्लेषण व हटके विचार करण्याची क्षमता, त्रिमितीय विचार क्षमता, चिकित्सक विचारक्षमता, भावना व विचार व्यक्त करण्याची क्षमता

३. नवनिर्मितीची दुर्दम्य इच्छा आणि अंत:प्रेरणा

४. प्रयोगशीलता आणि परिश्रम करण्याची तयारी

## डिझायनिंग क्षेत्रातील उपशाखा...

**लाइफस्टाइल व फॅशन डिझायनिंग :** वापरकर्त्यांच्या राहणीमानाशी निगडित गोष्टींचे (कपडे, पर्स, दागिने वगैरे) डिझाइन करणे.

**यूजर एक्स्पिरियन्स डिझायनिंग :** यामध्ये वापरकर्त्यांच्या बदलत्या गरजा व तांत्रिक प्रगती यांचा मेळ घालून नवीन वेबसाइट, मोबाईल ॲप्लिकेशन, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म डिझाईन करणे.

**इंटेरिअर डिझायनिंग :** यामध्ये वापरकर्त्यांच्या घराची, ऑफिसची, हॉटेल, मॉल, सार्वजनिक जागांची अंतर्गत तसेच बाह्यरचना करणे.

**मोबिलिटी व ट्रान्स्पोर्टेशन डिझायनिंग :** सर्व प्रकारची वाहने व दळणवळणाची साधने यांचे डिझायनिंग करणे.

**प्रॉडक्ट डिझायनिंग :** सर्व प्रकारच्या वस्तूंचे नवनवीन डिझाइन/सुधारणा करणे.

**ग्राफिक व कम्युनिकेशन डिझायनिंग :** विविध प्रकारचे ब्रँड्स, लोगो, पॅकिंग, जाहिराती यांचे डिझायनिंग करणे.

**फिल्म व ॲनिमेशन डिझायनिंग :** चित्रपट, मालिका यांच्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून डिझायनिंग करणे.

डिझायनिंग क्षेत्रात करिअर करण्यासाठी विविध राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये प्रवेश परीक्षा देऊन शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध होतात, त्यासंबंधी पुढील भागात माहिती घेऊ यात.



COURSE WORK

# By Design

Nina Mukherji on a relatively new field in India and its wide variety of career options

We see it all around us — in the design of a cellphone, the curve of a chair making it stylish yet comfortable, the shape of a doorknob that fits comfortably in the hand or the iconic curves and grooves of a soft drink bottle. Design permeates every aspect of our lives.

Many streams and specialisations have emerged and there is a huge demand for design professionals.

## UI/UX and Graphic

UX designers ensure that navigating a website or mobile application feels intuitive, smooth and logical, while UI and graphics designers are responsible for the visual appeal of the interface — colour schemes, buttons, fonts and other visual elements. Together, they are responsible for improving users' overall experience while using the site or app. IT firms, advertising firms, media companies and start-ups require these designers.

Some interface designers are self-taught, but many courses and certifications are available now. "One can do a bachelor's in UI/UX design from a design school, or study art in college and then get a diploma or certification. A person from art will have a background of how design flows," says Paresh Jodhawat, associate creative director at Wunderman Thompson, Mumbai. "HCI or human-computer interaction is gaining importance. It is a multidisciplinary course at the intersection of computer science, cognitive sciences, psychology and human factors engineering," he adds.

## Product and Industrial

Product designers conceptualise and create tangible inventions and products. The designer's role is to combine science, art and technology to design products that people can use. Product design is often confused with industrial design. Though there is some overlap, industrial design essentially brings artistic form and usability to mass-produced goods, e.g. home appliances, cars, computing devices.



Shyam Kumar studied fashion and lifestyle accessories design at the National Institute of Fashion Technology (NIFT). He is an intern at Intel Corporation even as he pursues his postgraduation in industrial design at IIT Guwahati. "I am involved in designing computing devices — the physical design, colour, tactile aspects are what I work on as part of my job. A designer has to enjoy solving problems and be detail oriented," he adds.

## Transportation

Analysts have observed that the exterior of a car has an instant impact on the consumer. Interior design and ergonomics must also follow suit. Transportation designers work on the exterior and interior design of all types of vehicles. And it has become even more challenging for these designers as they have to stay updated with emerging vehicular gadgets like GPS navigation, satellite radio and smartphone interfaces while designing a vehicle.

## Animation & Motion Graphic

Animation designers play a crucial role not just in movies and video games but in almost every industry in this digital age. Most companies use animation for their social media posts, and marketing and advertising initiatives.

Motion design, a newer subset of animation, has become very popular over the last few years. Motion graphics take static graphic design and give it animation and movement — for example, a logo that spins. "At its core, motion graphics is communication using animation and design principles. A very specific message using text elements, animation and imagery is imparted," says Prakash Sampath, a freelance video and motion graphic designer from Mumbai.

## Fashion

Fashion designers specialise in clothing, accessory or jewellery design. Some work on costume design and create wardrobes for television and movie productions. Some work for established designers and well-known brands. Fashion communication and styling are subfields that have grown in the last few years. One can also work as an image consultant, stylist, fashion journalist or blogger, or brand manager.

National Institute of Design (NID); NIFT; IDC School of Design, IIT Bombay; MIT Institute of Design, Pune; United World Institute of Design, Karnavati; and Symbiosis Institute of Design, Pune are some well-known design schools of India. Some, like NID and NIFT, have multiple campuses.

Students get to explore different courses before choosing their design stream. Vinayak Kulkarni, associate dean at MIT Institute of Design, shares, "The first year in any design institute is a common foundation programme. Students get to explore various materials and processes. They try out skill-oriented processes like sketching, model-making, wood crafting and metalworks. This way, they're in a better position to decide on their design specialisation in the second year."

Most colleges have their own entrance exams, including a design aptitude test, a studio test and an interview. If the student has a portfolio to show, that is an added advantage.

करिअरच्या वाटेवर

राजेश ओहोळ




# प्रॉडक्ट डिझाईनमधील वेगळेपण...

औद्योगिक तंत्रज्ञान आणि त्या आधारे उत्पादित झालेले पदार्थ किंवा वस्तू हे घटक आधुनिक अर्थव्यवस्थेत निर्णयात्मक भूमिका बजावतात. उत्पादनाची रचना किंवा डिझाईन हे दोन कार्यावर अवलंबून असते. पहिले प्रॉडक्ट डिझाईन आणि नंतर प्रोसेस डिझाईन, प्रॉडक्ट डिझाईन कार्यात प्रॉडक्टचे आकारमान, ताकद व इतर बाबी अभियांत्रिकी डिझाईन शास्त्रानुसार ठरविल्या जातात. त्याचबरोबर डिझाईन झालेला प्रॉडक्ट हा अपेक्षित कार्य सुरळीत व व्यवस्थित करेल का नाही, प्रॉडक्ट डिझाईनमध्ये कटाक्षाने पाळल्या जातात. यानंतरचा टप्पा येतो तो प्रोसेस डिझाईनचा. यामध्ये डिझाईन केलेला प्रॉडक्ट व्यवहार्यदृष्टीने अगदी स्पर्धात्मक खर्चात कसा उत्पादित करता येईल, याचा सर्वांगीण दृष्टीने विचार होतो व त्यानुसार प्रोसेस डिझाईन अंतिम होते. दिलेल्या वेळेत, कमीत कमी खर्चात व योग्य त्या उत्पादन प्रक्रियांचा व्यवस्थित अवलंब करून उत्पादन प्रक्रियेची रचना म्हणजे प्रोसेस डिझाईन म्हणता येईल. या डिझाईनमध्ये उत्पादन प्रक्रियांच्या क्रमाला महत्त्व असते. उत्पादन प्रक्रियांचा क्रम हा उत्पादन कार्यक्षम व प्रभावी आहे की नाही, हे ठरवीत असतो.

उत्पादन अर्थकारण हे अतिशय काळजीपूर्वक सांभाळावे लागते. उत्पादन उद्योगांना अपेक्षित प्रॉडक्टनुसार प्रोसेस डिझाईनची आवश्यकता भासते. कमीतकमी खर्च आणि जास्तीत जास्त उत्पादकता, हे तत्त्व उत्पादन उद्योगांना पाळावे लागते. नवीन वस्तुनिर्मिती किंवा उत्पादन हे क्षेत्र अतिशय विस्तृत व सर्वव्यापी असल्याने यातील संधी व आव्हाने जागतिक स्पर्धेमुळे वाढत आहेत. इंजिनिअरिंग प्रॉडक्ट डेव्हलपमेंट व डिझाईनमधील कॉम्प्युटर सॉफ्टवेअर पॅकेजच्या वापराने या क्षेत्रात मोठे क्रांतिकारक बदल झाले. विविध कंपन्यांचे वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी असंख्य प्रॉडक्ट बाजारात स्पर्धा करताहेत. औद्योगिक आणि बिगर औद्योगिक प्रॉडक्ट उत्पादन उद्योगांचे जाळे दिवसेंदिवस वाढत आहे. डिझाईन विषयातील प्रशिक्षित व उच्चशिक्षित मनुष्यबळाला महत्त्व प्राप्त झाले.

ही गरज ओळखून तंत्रशिक्षणात डिझाईन या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली. सरकारी/खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये गेट (GATE) परीक्षेतील स्कोअर आधारे डिझाईन विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळतो. यासाठी अभियांत्रिकी पदवीधारक पात्र ठरतात. या व्यतिरिक्त भारतीय प्रौद्योगिक संस्थांनी (आयआयटी) डिझाईन विषयाचे स्वतंत्र व विशेष पदव्युत्तर (एम. डिझाईन) अभ्यासक्रम सुरू केले आहेत. मुंबई, दिल्ली व कानपूर आयआयटी तसेच आयआयएस्सी बंगळूर या संस्थांमध्ये एम डिझाईन या पदव्युत्तर अभ्यासक्रमात अखिल भारतीय स्तरावर दरवर्षी घेण्यात येणाऱ्या डिझाईन सामाईक प्रवेश परीक्षाद्वारे (CEED) प्रवेश मिळतो.

या प्रवेश परीक्षांमार्फत उमेदवारांचे डिझाईन विषयासंबंधी ॲटिट्यूड, ड्रॉइंग कौशल्य, कल्पनाशक्ती आदी गुण तपासले जातात. या परीक्षेत नुसते उत्तीर्ण होऊनही चालत नाही. त्याचबरोबर त्या-त्या आयआयटी/आयआयएस्सी येथील स्वतंत्र चाचणी व मुलाखत यांना सामोरे जावे लागते. अभ्यासक्रम विशेष असल्याने उमेदवारांना रोजगाराची हमी निश्चित असते. इंडस्ट्रिअल डिझाईन, व्हिज्युअल कम्युनिकेशन, ॲनिमेशन, इंटर ॲक्शन डिझाईन आदी विषयांचे या अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षण मिळते.

**डिझाईन सामाईक प्रवेश परीक्षेसाठी पुढील शिक्षण उत्तीर्ण किंवा अंतिम वर्षातील उमेदवार पात्र ठरतात.**

१ इंजिनिअरिंग/आर्किटेक्चर/डिझाईन/इंटिरिअर डिझाईन अभ्यासक्रमातील पदवी शिक्षण.

२ डिझाईनमधील पदविका शिक्षण (एनआयडी/सीईपीटी किंवा समतुल्य)

३ बारावीनंतर पाच वर्षांचा जीडी आर्ट व नंतर एक वर्षाचा कार्यानुभव

४ आर्ट्स/सायन्स/कॉम्प्युटर ॲप्लिकेशनमधील पदव्युत्तर शिक्षण (M.Sc.)

डिझाईन सामाईक प्रवेश परीक्षा व संबंधित माहिती आयआयटी, मुंबईच्या www.idc.iitb.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच आयआयटी दिल्ली/कानपूर व आयआयएस्सी, बंगळूर यांच्या वैयक्ति संकेतस्थळांवरही माहिती मिळते. प्रॉडक्ट डेव्हलपमेंट हा प्रत्ये उद्योगाचा आत्मा असतो. त्यामुळे सातत्याने बदलणाऱ्या र्त स्पर्धेच्या बाजारपेठेत नवीन वस्तूच्या डिझाईन व

निर्मितीकडे सर्व उद्योजकांना मुख्य लक्ष केंद्रित कराव लागते. प्रत्येक उद्योग हा त्याने उत्पादित केलेल्या प्रॉडक्टवरून ओळखला जातो. डिझाईन-बिल्ड-टेस्ट या इंजिनिअरिंग तत्त्वाधारे बहुतांश सर्व प्रॉडक्टची निर्मिती होते. बाजारपेठेतील स्पर्धा, मागणी व बदलणारे तंत्रज्ञान यांची योग्यरीत्या सांगड घालून नवीन प्रॉडक्टच्या निर्मितीचे आव्हान तंत्रज्ञ, रचनाकार व शास्त्रज्ञ यांना द्यावे लागते.

» परदेशात शिकताना...

राजीव बोस



# क्रिएटिव्ह डिझाईनच्या विश्वात

वापरकर्त्याला चांगला अनुभव मिळवून देणे हे तंत्रज्ञानातील विकासाचे मुख्य उद्दिष्ट असते. नव्याने इंटरनेटच्या विश्वात प्रवेश केलेल्यांनाही असा अनुभव देणे हा तंत्रज्ञानाचा उद्देश असतो. हे क्षेत्र सर्व वयोगटांतील आणि क्षेत्रांतील लोकांना आकर्षित करीत असून, या तंत्रज्ञानाचा उपयोग ते दैनंदिन गरजांसाठी करताना दिसतात.

आपले अनुभव बहुतांश आपल्या आठवणींवर आधारित असतात. आपण एखादा विशिष्ट आवाज, रंग, स्वाद यांच्या मदतीने गोष्टी लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो. आपल्याला मिळालेला अनुभव आनंददायी आहे अथवा नाही, हे ती आठवण किती तीव्र किंवा टोकाची होती यावर अवलंबून असते. सध्या डिझाईन हा कोणत्याही क्रिएटिव्ह कामाचा आत्मा बनला आहे. या ज्ञानामध्ये एमएस प्रोग्रॅम इन युजर एक्स्पिरिअन्स किंवा 'यूआययूएक्स' हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास अधिक चांगली भर पडते व वापरकर्त्यांना अधिक चांगला अनुभव देणे शक्य होते.

हा अभ्यासक्रम विकसित करणाऱ्यांच्या लक्षात आले, की केवळ तांत्रिक गुणवत्तेच्या जोरावर डिझाईनच्या सौंदर्यविषयक अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे विविध क्षेत्रांतील विद्यार्थी या विशेष अभ्यासक्रमाकडे आकर्षित होत असून, ते त्यांच्यातील उपजत कलागुणांचा वापर करीत आहेत. ते या ज्ञानाला अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड देत या क्षेत्रात स्वतःसाठी जागा तयार करीत आहेत. या क्षेत्रात कॉम्प्युटर सायन्स, आर्किटेक्चर आणि फाईन आर्ट्‌ससारख्या क्षेत्रांतील विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.

अमेरिकेत या क्षेत्रातील ग्रॅज्युएट प्रोग्रॅमसाठी चार वर्षांची अंडरग्रॅज्युएट डिग्री आणि डिझाईनचे सखोल ज्ञान आवश्यक ठरते. या प्रोग्रॅममध्ये केवळ मनुष्य आणि संगणकातील इंटरॅक्शनवर भर न देता वापरकर्त्यांच्या अनुभवाला अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे डिझाईनिंगमधील नैपुण्यांमध्ये वाढ होते. हे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विविध कंपन्यामध्ये मोठ्या पगाराच्या नोकरीच्या संधी मिळू शकतात.

» संधी करिअरच्या...



सविता भोळे

# नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन

भारतात १९४८च्या औद्योगिक धोरणानुसार लहान उद्योगांना चालना मिळावी तसेच मदत व्हावी या उद्देशाने केंद्र सरकारने १९६१मध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन या संस्थेची सुरुवात अहमदाबाद येथे केली. नंतर या संस्थेचा विस्तार होऊन त्या भारतभर विविध ठिकाणी सुरू करण्यात आल्या. सध्या अहमदाबादसह कुरुक्षेत्र, विजयवाडा, बंगळूर, गांधीनगर, जोरहाट आणि भोपाळ अशा सात ठिकाणी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन सुरू आहेत.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन ही आंतरराष्ट्रीय स्तरावर औद्योगिक टेक्स्टाईल कम्युनिकेशन आणि डिझाइनसाठी शैक्षणिक तसेच संशोधन क्षेत्रात मान्यताप्राप्त संस्था आहे. भारत सरकारने २०१४च्या कायद्यानुसार या संस्थेला राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून गौरविले आहे. भारत सरकारच्या सायन्स अँड टेक्नॉलॉजी मंत्रालयानेही २०१५मध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनला सांइटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ऑर्गनायझेशन म्हणून गौरविले आहे. यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन, अहमदाबाद ही भारतामध्ये सर्वांत प्रतिष्ठित डिझाइन स्कूल मानले जाते. युरोप आणि आशियातील पहिल्या २५ डिझाइन स्कूल्समध्ये तिचा समावेश आहे. येथे अनेक ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट आणि डॉक्टरल प्रोग्रॅम्स राबविले जातात.

या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत तसेच भारताबाहेरील मल्टी नॅशनल कंपन्यांमध्ये उत्तम पगाराच्या नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनमध्ये प्रवेश घेण्यासाठी स्वतंत्र प्रवेश परीक्षा (DAT-Design Apptitude Test) घेतली जाते.

## ही परीक्षा दोन टप्प्यांत होते.

- प्रिलिमिनरी
- मेन्स

संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करून या परीक्षेसाठी रजिस्ट्रेशन केले जाते. भारतातील १२ केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाते. पदवी तसेच पदव्युत्तर कोर्सेससाठी स्वतंत्रपणे DAT घेतली जाते तर PhD च्या प्रवेशासाठी DRT (Design Research Test) स्वतंत्ररीत्या घेतली जाते.

## अहमदाबाद येथील कोर्सेस

### 1) B.Des इन ॲनिमेशन फिल्म डिझाइन

- **कालावधी :** ४ वर्षे
- **पात्रता :** बारावी उत्तीर्ण
- **प्रवेश परीक्षा :** NID- DAT

हा कोर्स याशिवाय १) ग्राफिक डिझाइन २) फर्निचर अँड इंटीरियर डिझाइन ३) प्रॉडक्ट डिझाइन ४) फिल्म अँड व्हिडिओ कम्युनिकेशन ५) टेक्स्टाइल डिझाइन ६) एक्झिबिशन डिझाइन ७) सिरॅमिक अँड ग्लास डिझाइन अशा एकूण ८ विषयांमध्ये येथे उपलब्ध आहे.

### 2) M.Des इन ॲनिमेशन फिल्म डिझाइन

- **कालावधी :** २ वर्षे
- **पात्रता :** कोणत्याही विषयातील पदवी
- **प्रवेश परीक्षा :** NID-DAT

पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स १) फर्निचर अँड इंटिरिअर डिझाइन २) डिझाइन फॉर रिटेल ३) एक्सपिरीअन्स इंटर ॲक्शन डिझाइन ४) फोटोग्राफी डिझाइन ५) टेक्स्टाइल डिझाइन ६) अपरोल डिझाइन ७) डिजिटल गेम डिझाइन ८) ग्राफिक डिझाइन ९) लाइफस्टाइल ॲसेसरी डिझाइन १०) प्रॉडक्ट डिझाइन ११) टॉय अँड गेम डिझाइन १२) सेरमिक अँड ग्लास डिझाइन १३) फिल्म अँड व्हिडिओ कम्युनिकेशन १४) इन्फॉर्मेशन डिझाइन १५) न्यू मीडिया डिझाइन




### 3) Ph.D

- **कालावधी :** ३ ते ५ वर्षे
- **पात्रता :** त्या त्या क्षेत्रातील मास्टर डिग्री
- **प्रवेश परीक्षा :** स्क्रिनिंग, DRT, Interview.

हा कोर्स डिझाइन एज्युकेशन, सोशल इन्हवेशन, डिझाइन इनोव्हेशन या विषयांमध्ये उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकतात. **संकेतस्थळ :** www.nid.edu

» संधी करिअरच्या...

विवेक वेलणकर

# डिझायनिंगच्या प्रवेश परीक्षा



मागील लेखात आपण डिझायनिंग क्षेत्रात कोणाला करिअर करता येते आणि डिझायनिंग क्षेत्रातील विविध शाखांची माहिती घेतली. या लेखात आपण या क्षेत्रातील तीन सर्वोत्तम संस्था व त्यांच्या प्रवेश परीक्षांसंबंधी माहिती घेऊयात. या प्रत्येक संस्थेची स्वतंत्र परीक्षा व प्रवेश प्रक्रिया होते. मागील लेखात आपण पाहिलेच आहे, की डिझाईन क्षेत्रात सर्जनशीलता व विश्लेषणात्मक क्षमता या दोन पैलूंचा सुयोग्य मेळ आवश्यक आहे. त्यामुळे डिझायनिंगच्या प्रवेशपरीक्षेतसुद्धा प्रामुख्याने या दोन पैलूंच्या संबंधी विद्यार्थ्यांची क्षमता पडताळून पाहण्यात येते. या संस्थांमध्ये प्रवेशासाठी बारावी आर्ट्स/कॉमर्स/सायन्स यांपैकी कोणत्याही शाखेतून किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र असतात.

यंदा बारावीला असणारे विद्यार्थी या प्रवेश परीक्षा देऊ शकतात. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझायनिंग तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी या संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेत लेखी परीक्षेत साधारणपणे दोन भाग असतात. पहिल्या भागात सामान्य ज्ञान, तार्किक विचार करण्याची क्षमता, कलात्मक दृष्टिकोन, सामाजिक संवेदनशीलता या विषयांवर बहुपर्यायी प्रश्न असतात, तर दुसऱ्या भागात सर्जनशीलतेवर आधारित प्रश्न असतात. जे विद्यार्थी या लेखी परीक्षेत यशस्वी होतात, त्यांना पुढच्या टप्प्यात संस्थेत प्रत्यक्ष जाऊन सर्जनशीलतेची स्टुडिओ टेस्ट द्यावी लागते. त्यानंतर मुलाखत होऊन अंतिम निवड होते. आयआयटीच्या डिझायनिंग इन्स्टिट्यूटच्या प्रवेशासाठी मात्र फक्त लेखी परीक्षा घेण्यात येते. आयआयटीच्या प्रवेश परीक्षेसाठी ५ नोव्हेंबरपर्यंत त्यांच्या uceed.iitb.ac.in या संकेतस्थळावरून अर्ज भरता येतील. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझायनिंग प्रवेश परीक्षेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत त्यांच्या संकेतस्थळावरून अर्ज भरता येतील. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी प्रवेश परीक्षेची जाहिरात १५ नोव्हेंबरपर्यंत प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे.

## या महत्त्वाच्या तीनही संस्थांची माहिती पुढीलप्रमाणे

### 1 नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझायनिंग

ही १९६१मध्ये स्थापन झालेली देशातील पहिली डिझायनिंग इन्स्टिट्यूट आहे. या संस्थेच्या आज रोजी ७ ठिकाणी शाखा असून त्यापैकी अहमदाबाद, विजयवाडा, कुरुक्षेत्र, जोरहाट व भोपाळ या ठिकाणी बारावीनंतर चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवला जातो. यात पहिले वर्ष फाउंडेशन वर्ष असते, तर नंतर उरलेली तीन वर्षे डिझायनिंगच्या आठ पैकी कोणत्याही एका शाखेत स्पेशलायझेशन करता येते. संस्थेची अधिक माहिती संस्थेच्या www.nid.edu या संकेतस्थळावर मिळेल.

### 2 नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी

या संस्थेची स्थापना १९८६मध्ये भारत सरकारच्या कापड व वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या पुढाकाराने झाली. या संस्थेच्या आज भारतात १७ ठिकाणी शाखा असून, फॅशन डिझायनिंग, टेक्स्टाईल डिझायनिंग, लेदर डिझायनिंग, ॲपरल डिझायनिंगसह विविध कोर्सेस तेथे चालवले जातात. संस्थेची अधिक माहिती संस्थेच्या www.nift.nic.in या संकेतस्थळावर मिळेल.

### 3 आयआयटी मुंबई डिझायनिंग स्कूल

भारत सरकारच्या मनुष्य संसाधन मंत्रालयाच्या पुढाकाराने मुंबई येथे १९६९मध्ये आयआयटी IDC अर्थात इंडस्ट्रिअल डिझायनिंग सेंटरची स्थापना झाली. या संस्थेत इंडस्ट्रिअल डिझायनिंग, ॲनिमेशन डिझायनिंग, व्हिज्युअल कम्युनिकेशन, व्हेईकल डिझायनिंग असे बारावीनंतर ४ वर्षांचे डिग्री, तसेच ५ वर्षांचे इंटिग्रेटेड मास्टर्स डिग्री कोर्सेस चालवले जातात. संस्थेची अधिक माहिती संस्थेच्या idc.iitb.ac.in या संकेतस्थळावर मिळेल.

# फॅशन डिझाइनच्या क्षेत्रातील ग्लॅमरइतकेच ग्रामर महत्त्वाचे

विविध संस्कृती आणि परंपरेसाठी ओळखला जाणारा देश अशी आपल्या देशाची ख्याती आहे. भारतीय फॅशनमध्ये हजारो वर्षांचा पारंपारिक इतिहास आहे. प्रत्येक भागामध्ये विविध प्रकारचे पारंपारिक कपडे आणि वेगळ्या पद्धती आहेत. सद्य:स्थितीत आधुनिक फॅशन उद्योग जगत सर्वत्र वेगाने वाढत आहे. आंतरराष्ट्रीय विकासाशी फॅशन उद्योग संबंधित आहे. लोक ज्या कपड्यांना प्राधान्य देतात आणि ते परिधान करतात त्यावरून त्यांच्या संबंधित परंपरेची ओळख त्यायोगे ते करून देत असतात. लोकांकडून वापरल्या जाणा-या वस्त्रांची निवड साधारणपणे त्यांच्या जाती, धर्म, स्थिती आणि संपत्तीवर अवलंबून असते. स्वातंत्र्यानंतर लगेच, भारतीय फॅशन जगत जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे प्रभावित झाले.

**फॅशन टेक्नॉलॉजी आणि डिझायनिंगमध्ये स्वारस्य आहे?** : फॅशन डिझाईनिंग हे दर्जेदार शिक्षण निवडून आपण आपल्या उत्कटतेस संपन्न समृद्ध कारकीर्दीत रुपांतर करू शकता. दूरदृष्टी असण्याव्यतिरिक्त, फॅशन डिझायनर बनण्यासाठी फॅशन इच्छुकांकडे आवश्यक इतरही कौशल्ये असावी लागतात. फॅशन करण्याच्या कलांचे महत्त्वपूर्ण कौशल्य अंगी असणं आवश्यक असतं. आपल्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्यात दूरदृष्टी असण्याची आवश्यकता असते.

**फॅशन डिझायनरसाठी आवश्यक कौशल्ये** : मजबूत व्यवसाय बांधणी : आपल्या संभाव्य निर्णयांचे मूल्य आणि लाभांची गणना करण्यासाठी आपल्यात उत्कृष्ट व्यवसाय कौशल्ये असली पाहिजेत. आपण ह्या उद्योगासाठी उत्सुक असणं आवश्यक असतं.

**चांगली संवाद कौशल्यं** : आपल्याजवळ आवश्यक कौशल्ये असणं, तसेच आपल्या व्यवसायात आपले विचार आणि कल्पना व्यक्त करण्यात आपण सक्षम असणं अधिक महत्त्वाचं असतं. चांगले संभाषण कौशल्य तुमचा आत्मविश्वास वाढवते आणि अपेक्षित अंतिम परिणामासाठी ते मदत करते.

**स्पर्धात्मकता** : जागतिक स्तरावर फॅशन उद्योग सतत विकसित होत आहे, त्यास त्याच्या व्यावसायिकांसह उत्क्रांत होणं आवश्यक असतं. हे आपल्याला जागतिक आव्हानं आणि स्पर्धा यासाठी खुलं असणं आवश्यक असतं. एक डिझायनर म्हणून आपल्यात स्पर्धात्मकतेची भावना असणं आवश्यक असतं.

**सर्जनशीलता आणि गहन निरीक्षण** : सर्जनशीलता हा डिझायनरचा गुणधर्म असावा लागतो. आपण चालवत असलेल्या उद्योगांच्या प्रवाहातील आपण एक महान निरीक्षक असणं आणि



आपल्या डिझाइनमध्ये नाविण्यपुर्णता आणणं आवश्यक असतं. जगभरांतील डिझाइनरकडून अनेक व्यावसायिक बाबी जाणून घ्याव्यात. त्यांच्या व्यवसायाचं वेगळेपण, त्यांची पार्श्वभूमी, त्यांची डिझाईन शैली, त्यांनी शिक्षण घेतलेली संस्था, त्यांची विविध कौशल्यं अशा अनेक बाबींचा विश्लेषणात्मक अभ्यास करणं उपयुक्त ठरत असतं.

**अत्यंत महत्त्वपूर्ण बाब** : डिझायनरकडे रेखांकन कौशल्ये महत्वाची असतात. कागदावर आपले डिझाइन किंवा विचार सादर करण्यासाठी आपल्यात ती कौशल्य असणं आवश्यक असतं. स्टोरीबोर्ड आणि उत्पादन श्रेणी कशी तयार करावी? ते जाणून घ्यावं. सामग्रीचा स्रोत / उपलब्धता कुठे आणि कशी आहे ? हे माहित करून घेणं अत्यंत महत्वाचं असतं. सर्व प्रकारच्या कापडांचा वापर करून शिवणकाम करण्यासाठी त्याचं यांत्रिक कौशल्य अवगत करून घेणं जरुरीचं असतं.

**चांगला दृष्टिकोन** : साहित्य आणि रंगांच्या निवडीसाठी आपला दृष्टीकोन चांगला असणं महत्वाचं असतं. फॅब्रिकचे सखोल ज्ञान डिझाइन करताना ते योग्यरित्या वापरण्यासाठी आवश्यक असतं. आपल्या अंगी असलेल्या सर्वच कौशल्यांचा विकास करण्यासाठी नवा सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा लागतो. आपल्या फॅशन डिझाइन करिअरची सुरूवात करण्यासाठी प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेणं हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. अनुभवी फॅशन डिझायनरकडून शिकण्याची


Ed
Marath
School o
ADM
DI
INTER
Two
Affiliated to
Technic
Inst
Eligibility : The c
equivalent Examin
state. The candida
Graduation can als
90497566
98819160
302/A, Dec
Email :


---

अपडेट

# फॅशन डिझाईनच्या क्षेत्रातील ग्लॅमर

विद्यावाचस्पती विद्यानंद

भारतीय फॅशनमध्ये हजारो वर्षांचा पारंपारिक इतिहास आहे. प्रत्येक भागामध्ये विविध प्रकारचे पारंपारिक कपडे आणि वेगळ्या पद्धती आहेत. सद्य:स्थितीत आधुनिक फॅशन उद्योग जगत सर्वत्र वेगाने वाढत आहे. आंतरराष्ट्रीय विकासाशी फॅशन उद्योग संबंधित आहे. फॅशन डिझाईनिंग हे दर्जेदार शिक्षण निवडून आपण आपल्या उत्कटतेस समृद्ध कारकिर्दीत रूपांतर करू शकता. दूरदृष्टी असण्याव्यतिरिक्त, फॅशन डिझायनर बनण्यासाठी फॅशन इच्छुकांकडे आवश्यक इतरही कौशल्ये लागतात. फॅशन करण्याच्या कलांचे महत्त्वपूर्ण कौशल्य अंगी असणं आवश्यक असतं.



## आवश्यक कौशल्ये...

१ **व्यवसाय बांधणी** : आपल्या संभाव्य निर्णयांचे मूल्य आणि लाभांची गणना करण्यासाठी आपल्यात उत्कृष्ट व्यवसाय कौशल्ये असावे.

२ **संवाद** : चांगले संभाषण कौशल्य तुमचा आत्मविश्वास वाढवते आणि अपेक्षित अंतिम परिणामासाठी ते मदत करते.

३ **स्पर्धात्मकता** : जागतिक स्तरावर फॅशन उद्योग सतत विकसित होत आहे, त्यास त्याच्या व्यावसायिकांसह उत्क्रांत होणं आवश्यक असतं. हे आपल्याला जागतिक आव्हानं आणि स्पर्धा यासाठी खुलं असणं आवश्यक असतं. डिझायनर म्हणून आपल्यात स्पर्धात्मकतेची भावना असावी.

४ **सर्जनशीलता आणि निरीक्षण** : आपण चालवत असलेल्या उद्योगांच्या प्रवाहातील निरीक्षक असणं आणि आपल्या डिझाईनमध्ये नाविण्यपुर्णता आणणं आवश्यक असतं. जगभरांतील डिझाइनरकडून अनेक व्यावसायिक बाबी जाणून घ्याव्यात. त्यांच्या व्यवसायाचं वेगळेपण, त्यांची पार्श्वभूमी, त्यांची डिझाईन शैली, त्यांनी शिक्षण घेतलेली संस्था, त्यांची विविध कौशल्य अशा अनेक बाबींचा विश्लेषणात्मक अभ्यास करणं उपयुक्त ठरत असतं.

५ **रेखांकन** : कागदावर आपले डिझाइन किंवा विचार सादर करता यावं. स्टोरीबोर्ड आणि उत्पादन श्रेणी कशी तयार करावी? ते जाणून घ्यावं. सामग्रीचा स्रोत/उपलब्धता कुठे आणि कशी आहे? हे माहीत करून घेणं महत्त्वाचं असतं. सर्व प्रकारच्या कापडांचा वापर करून शिवणकाम करण्यासाठी त्याचं यांत्रिक कौशल्य अवगत करून घेणं जरुरीचं असतं.

साहित्य आणि रंगांच्या निवडीसाठी दृष्टिकोन चांगला असावा. फॅशन डिझाइन करिअरची सुरुवात करण्यासाठी प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेणं हा महत्त्वाचा टप्पा आहे. अनुभवी फॅशन डिझायनरकडून शिकण्याची संधी मिळण्यासाठी अपरेंटिसिपीस आणि इंटर्नशिपमध्ये अनेक कौशल्य विकसित करता येतात. पुरुष आणि महिला दोन्ही फॅशन आणि डिझायनर कपडे परिधान करणं पसंत करत आहेत. त्यामुळे अनेक नवीन संस्था उदयास आल्या आहेत. त्या ठिकाणी फॅब्रिक आणि पोशाख डिझाइन आणि तंत्रज्ञानातील प्रतिभा आणि सर्जनशील वाढविण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना शिकवलं जातं

## रोजगाराच्या संधी

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून, फॅशन डिझायनिंग विद्यार्थ्यांना मोठ्या ब्रॅण्ड अंतर्गत काम करण्यास सांगितले जाते आणि फॅशनच्या मूलभूत गोष्टी जाणून घेण्यासाठी आणि स्वत:च्या संकल्पनेनुसार फॅशनच्या वस्तू विकसित करण्यासाठी डिझाइनर्सना साहाय्य केले जाते. ते करिअरचे अनेक मार्ग खुले करते. फॅशन डिझायनिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना वेशभूषा डिझायनर, मर्कंटायझर, शिक्षण, टेक्स्टाईल उत्पादन, फॅशन प्रकाशक, फॅशन प्रोग्रॅम उत्पादक, चित्रपट निर्मिती विभाग, फॅशन डिझायनर, फॅशन स्टायलिस्ट, स्टोअर व्यवस्थापक, फॅशन सल्लागार, व्हिज्युअल मर्चंडाइझर, उत्पादन व्यवस्थापक, गुणवत्ता नियंत्रक, फॅशन छायाचित्रकार इत्यादी अनेक क्षेत्रांत कामाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

भारतीय फॅशन रिटेल बाजार खूप मोठा आहे. अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय उद्योजक तयार वस्त्र निर्मितीच्या क्षेत्राच्या विकासास हातभार लावत आहेत. फॅशन डिझाईन कारकिर्दीला सुरुवात करण्यासाठी कठोर परिश्रम आणि चिकाटी आवश्यक असते. फॅशन डिझाईन करियरची तयारी करताना, आपले सर्वोत्कृष्ट काम दर्शविण्याचा प्रारंभ करणे महत्त्वाचं असतं. तुम्ही फॅशन डिझायनिंगच्या क्षेत्रांत पदार्पण करत असताना तुमचे पोर्टफोलिओ तुमच्या कौशल्यपूर्ण कामाची ओळख सांगत असतात. त्यासाठी तुम्ही तुमच्या स्वतः विषयीचे तसेच तुम्ही करू शकत असलेल्या कामाबद्दलची सविस्तर माहिती सांगू शकणारे नावीन्यपूर्ण पोर्टफोलिओ तयार करून घेणं उपयुक्त ठरतं.

(लेखक करिअर, मानसशास्त्रीय समुपदेशक आहेत)





👉Feeling uncertain about your career direction? 🤔 Don't stress!

Take the first step towards clarity by going for an aptitude test.

💡 Embrace the journey of self-discovery and pave the way for a fulfilling career! 💼 ✨

#CareerPath #SelfDiscovery #AptitudeTest#AbhinavCareerScope




ABHINAV CAREER SCOPE
Perfect Career Guide

**PROVIDES**

- Career Guidance For $8^{th}$ To $12^{th}$ std
- Aptitude Test
- Admission Process Counselling
- Course Selection
- College Selection
- Abroad Education

<u>A Successful Career Is Just One Step Away And We Make You Proud Of Your Career…</u>